# महाभारत

महाभारतात कृष्णानी अर्जुनालाच नाही तर कोणालाही समर्पक अशी उत्तर दिलीत.

आपली व्यथा मांडतांना कर्ण कृष्णाला म्हणतो, माझ्या जन्मदात्या आईनी जन्मत:च मला त्यागले. आचार्य द्रोण यांनी मी क्षत्रिय नसल्याकारणानी शस्त्र विद्या देण्यास नकार दिला. मी पात्र नाही असे त्यांचे मत. द्रौपदीच्या स्वयंवरातही मला अपमानीत करण्यात आले. कारण मी राजपरीवारातील नाही. संपूर्ण जीवनभर मला अपमानच सहन करावा लागला. कर्ण विचारतो हे केशवा, माझा अपराध काय?

मंद स्मित करीत कृष्णानी त्याला अतिशय सुरेख उत्तर दिले. कृष्ण म्हणतो हे सूर्यपुत्रा, माझा तर जन्मच बंदिवासात झाला. जन्मापासूनच मृत्यु माझी प्रतिक्षा करत होता. जन्माच्याच रात्री मला माझ्या जन्मदात्यांना सोडाव लागले. फक्त दोनच दिवसांचा असतांना, राक्षसांनी माझ्यावर हल्ला केला. मला वारंवार जीवे मारण्याचे अनेक प्रयत्न झालेत. आणि जिथे मी पोहचलो तिथे तर, सर्वच काम मला करावे लागलेत. स्वरक्षणापासून ते गाई वनात नेण्यापासून तर शेणगोठ्यापर्यंत सर्वच मी केले. माझा सख्खा मामाच माझ्या जिवाचा वैरी होता. मला काही कमी आव्हान नव्हती, जिवनात! अन्याय तर माझ्यावरही जीवनभर झालाच !!

कर्ण आपल्या भूतकाळातील अपमानाच्या घटनांमध्ये, आठवणींमध्ये लिन राहायचा. तर कृष्ण आपल्या भूतकाळासंबंधी कधीच भाष्य करत नाही. वास्तविक अन्याय दोघांवरही झालाय. कर्ण सतत मागे तर कृष्ण सतत समोर बघत राहिले. एकात ओतप्रोत क्रोध भरलेला तर दुसरा भूतकाळातील त्या घटनांना कधीच वाईट म्हणत नाही. सर्वच स्विकारले, अंगीकारले. एकानी क्रोधाग्नीत जळून जीवन व्यतीत केले तर एकानी हसून सर्व आनंदानी स्विकारले.

खरं म्हणजे आपलं जीवन हे आपलंच असतं. त्याचे सर्वेसर्वा आपणच आहोत. तेव्हा ते कसं -

जगायच हे आपणच ठरवायच, रडतकुढत कि हसतमुखानो? लक्षात ठेवा, जीवन आहे तर समस्या राहणार अन समस्या आहेत तर समाधानहि आहेच. आणि मुख्य म्हणजे आपण आपल्या व आपल्याच परिवारासाठी जगतो ना? मग क्लेश का? दुःख कशाच? आपण स्वतःलाच विचारा.....!!



सौ. उज्वला श्रीराम प्रभुणे
स्टेट बँक कॉलनी
अमरावती

